जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
Address – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
E-Mail ID : crimepress.pune@gov.in Ph.020 / 26122478

पुणे पोलीस
Pune Police

स्वस्ति श्रीराज्याभिषेक शके ३५०

# दैनंदिन गुन्हयांची प्रेसनोट

## पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर
## प्रेस नोट दि.३१/०३/२०२५
## दि.३०/०३/२०२५ रोजी रात्रौ ००/०० वा.ते २४/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

### भाग-१ ते ५ चे गुन्हे

१

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | सहकारनगर पो स्टे १२५/२०२५, भा.न्या.सं.१०६, ३२४(४) |
| **फिर्यादी** | प्रसाद केंची वय ३० वर्षे ,रा.सुखसागर नगर अप्पर पुणे |
| **आरोपीत** | केशव श्रीमंत जाधव वय २८ वर्ष रा.काञज कोंढवा रोड साई निसर्ग सोसायटीचे मागे पुणे (अटक ) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.३०/०३/२०२५ रोजी १६/२० वा.चे सुमा.सायबा अमततुल्य अहिल्यादेवी चौक पुणे सातारा रोड पुणे |
| **तपशिल** | यातील वर नमुद इसमाचे साईबा अमृततुल्य या चहाच्या दुकानात त्याने सुरक्षेचे कोणतीही उपाययोजनाची काळजी न घेता निष्काळजीपणा व हयगयीचे कृतीमुळे सदर दुकानात लागलेल्या आगीत दुकानात काम करणारा इसम संतोष श्रीसेन हेगडे २६ वर्षे हा होरपळुन जखमी होवुन त्यांचे मृत्युस कारणीभुत झाला असुन फिर्यादी यांचे दुकान व शेजारील इतर दुकानांचे जळुन व त्यामधील सामान व फर्निचरचे नुकसान होण्यास कारणीभुत झाला. |
| **त.अंमलदार** | पोलीस निरीक्षक (गुन्हे),श्रीमती सुरेखा चव्हान मो.नं.९६५७१५८७५० |

२

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | डेक्कन पो स्टे ५९/२०२५,भा.न्या.सं.कलम२८१,१०६(२),मोव्हेॲक्ट १८४,१३४(अ)(ब),११९/१७७ |
| **फिर्यादी** | अंकिता जोशी,वय २१ वर्षे,रा.सदाशिव पेठ, पुणे |
| **आरोपीत** | अज्ञात चारचाकी वाहनावरील चालक (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२२/०३/२०२५ रोजी रात्रौ ०१/३० वा.चे दरम्यान बी.एम.सी. सी.रोड,रायगड बंगल्यासमोर, डेक्कन, पुणे सार्वजनिक रोडवर |
| **तपशिल** | यातील नमुद इसमाने त्याचे ताब्यातील वाहन हे वाहतुकीचे नियमांकडे दुर्लक्ष करून,हयगयीने,अविचाराने व भरधाव वेगात चालवुन,नमुद ठिकाणी यातील फिर्यादी यांचे चुलते अरूण शंकर जोशी, वय ६० वर्षे,रा.विवेकश्री बिल्डींग,सदाशिव पेठ, राजेंद्रनगर,पुणे हे नमुद ठिकाणी झाडु मारत असताना यांस पाठीमागुन जबर ठोस मारून,गंभीर जखमी करून,त्याचे मृत्युस कारणीभुत होवुन,अपघाताचे ठिकाणी न थांबता,अपघाताची खबर न देता पळुन गेला. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. कुलकर्णी मो नं ७८७५२७५१०५ |

३

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | विश्रांतवाडी पो स्टे ८०/२०२५,भा.न्या.सं.कलम ३१९(२),३१८(४),माहिती व तंत्रज्ञान का.क.६६ (ड) |
| **फिर्यादी** | एक इसम,वय ४७ वर्षे रा.विश्रांतवाडी पुणे |
| **आरोपीत** | मोबाईल धारक व बँक खातेधारक व वापराकर्ते (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दिनांक १२/१२/२०२४ ते दि. २३/०१/२०२५ रोजी दरम्यान ऑनलाईन माध्यमाव्दारे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांना नमुद मोबाईल धारक व बँक खातेधारक यांनी शेअर मार्केटमध्ये ट्रेडींग गुंतवणुक करण्याच्या माध्यमातुन थोडीशी रक्कम देवुन त्यांचा विश्वास संपादन करुन फिर्यादी यांची २२,२८,६००/- रु.ची. आर्थिक फसवणुक केली. |

| | |
|---|---|
| **त.अंमलदार** | वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री जाधव मो.नं ९९२२३४८८८० |

४

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | मुंढवा पो स्टे १०१/२०२५, भा.न्या.सं. कलम १०६(१) |
| **फिर्यादी** | सुभाष आंगारके, वय ३७ वर्षे, रा. शिर्के कंपनी जवळ, पुणे |
| **आरोपीत** | कंपनी व कंपनीचे ठेकेदार (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२८/०३/२०२५ रोजी १६/३० वा. ते दि.२९/०३/२०२५ रोजी दुपारी १५/३० वा.च्या दरम्यान घोरपडी गाव येथील पुणे मिरज रेल्वे लाईन फाटकाच्या बाजुला असलेल्या मरीआई माता मंदीराजवळ, नवीन ब्रिजच्या कामासाठी खोदलेल्या खड्ड्यात |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांचा मुलगा वय ९ वर्षे हा वर नमुद ठिकाणी ब्रिजच्या कामासाठी पिलर (खांब)उभारण्या करीता खोदलेल्या सुमारे २० बाय १० लांबी रुंदीचा व अंदाजे १५ फुट खोल असलेल्या पाण्याने भरलेल्या खड्ड्याकडे गेलेने सदर ठिकाणी काम करत असलेल्या बांधकाम कंपनीने व कंपनीच्या ठेकेदारांनी पाण्याने भरलेल्या खड्ड्याच्या बाजुला कोणत्याही प्रकारची योग्य त्या सुरक्षिततेची खबरदारी न घेतल्यामुळेच फिर्यादी यांचा मुलगा सदर खड्यातील पाण्यात पडुन मयत झाला. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. श्री. अतुल थोरात, मो.नं ९८५०१०७६२९ |

५

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | चंदननगर पो स्टे १४५/२०२५, भा.न्या.सं.कलम ३३१(२), ३०५ |
| **फिर्यादी** | एक महिला,वय ७० वर्षे रा.चंदननगर पुणे |
| **आरोपीत** | अज्ञात |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.३०/०३/२०२५ रोजी १३/०० ते १७/०० वा.दरम्याण कल्पतरु सोसायटी खराडी रोड चंदननगर पुणे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांचे मुलाचा राहता फ्लॅट कुलुप लावुन बंद असताना,कोणीतरी अज्ञात इसमाने त्यांचे राहते घराचे मुख्य दरवाजाचे कुलुप कशाचे तरी सहाय्याने उचकटुन,त्यावाटे आंत प्रवेश करून,बेडरूम मधील कपाटातील ५०,०००/- रु.रोख व सोन्याचे दागिने असा एकुण १,९०,०००/- रु.कि.चा. ऐवज घरफोडी चोरी करून नेला. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. श्री. अजय असवले,मो.नं ८८३००६३११४ |

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**